**सत्र खटला क्र. ३१/२०२१**
**सरकार -वि- गणेश चौधरी व इतर**
**<u>निशाणी क्रमांक-७७</u>**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ याची जबानी</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - देविदास सुखदेव घाटे,**

**वय - ६२ वर्ष, व्यवसाय - निवृत्त ( सहाय्यक सह व्यवस्थापक),**

**राहणार - पहुर, ता. जामनेर, जि. जळगांव.**

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. एस. एच. जोशी.</u>**

०१. घटना दि.२४/०८/२०२० रोजी घडली. त्यावेळी मी आय. डी. बी. आय. बँक शाखा मलकापूर येथे शाखा अधिकारी म्हणून कार्यरत होतो. माझ्या बँक शाखेमध्ये कुंड खुर्द, कुंड बुद्रुक, तालस वाडा, तांदुळवाडी ही गांवे वित्त पुरवठा व शेती संबंधीत वित्त पुरवठ्यासाठी नेमून दिलेली होती. आरोपी हे त्यावेळी अंदाजे दिड वाजता बँकेमध्ये आले व माझ्या कॅबिनमध्ये आले. ते सर्वजण कुंड बुद्रुक येथील शेतक-यांना आत्ता च्या आत्ता कर्ज द्या असे म्हणू लागले. मी त्यांना सांगितले की, कोरोनाचे निर्बंध असून बँकेचे कामाचे तास कमी आहेत. तसेच क्रमा क्रमाने सर्व गावांना कर्ज पुरवठा केला जातो असे सांगितले. त्यावेळी त्यांनी टेबलवरील संचीका अस्थाव्यस्थ करून फेकल्या तसेच मला चापट बुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी मला शिवीगाळ करत असतांना मी त्याचे मोबाईल मध्ये शुटिंग करत होतो. त्यावेळी मी बँकेच्या कृषी अधिका-यांना कर्ज वाटप करण्यासंदर्भात सांगितले. त्यावेळी आरोपी क्र.०६ ने मला मोबाईलवरील शुटींग बंद करून तुमच्या खुर्चीवर बसा असे सांगितले. त्यावेळी तो मला वृत्तवाहीनीचे वार्ताहार असल्याचे सांगत होता. मी मोबाईल बंद करून खिश्यात ठेवला असता त्याने इतर आरोपींना मला मारहानी करीता इशारा करून चिथावनी दिली. त्यावेळी मी माझ्या सुरक्षारक्षकांना सांगुन मदतीसाठी पोलिसांना बोलवले. त्यानंतर एक पोलिस व एक गृहरक्षक बँकेमध्ये आला.

त्यांच्या समक्ष सुध्दा आरोपींनी फाईल फेकल्या व मला चापट बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच दि.२५/०८/२०२० ला आरोपी क्र.०५ हा बँकेमध्ये आला व मला म्हणाला की, तुला काल कमी झाले का, अजुन कर्जवाटप करा. मी त्यावेळी सुरक्षा रक्षकाला पोलिस ठाण्यामध्ये जाण्यास सांगितले असता तो तेथून पळून गेला. त्यानंतर मी घटनेची फिर्याद देण्यासाठी पोलिस ठाणे मलकापूर येथे गेलो. दि. २५/०८/२०२० रोजी मी पोलिस ठाणे मलकापूर येथे गेलो व तेथे आरोपींविरूध्द तक्रार दाखल केली. त्यानंतर दि.१०/०९/२०२० रोजी आरोपींपैकी एकजण बँकेत आला व तुला २४/०८/२०२० ला कमी झाले का असे म्हणून तो तेथून पळून गेला. दि.२४/०८/२०२० रोजीच्या घटनेचा व्हीडीओ व्हायरल झाल्यामुळे मला वरीष्ठांकडून सदर बाब गुन्ह्यामध्ये मोडत असल्याचे फोनवर सांगण्यात आले. तसेच सदर घटनेबाबत तक्रार दाखल करण्यास मला निर्देशित करण्यात आले. त्यानंतर मी दि.११/०९/२०२० रोजी घटनेची फिर्याद पोलिस ठाणे मलकापूर येथे दाखल केली. फिर्याद मला दाखविली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. ती **निशाणी क्र.७८** वर आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर फिर्यादीवरून पोलिसांनी घटनेचा प्राथमिक अहवाल नोंदविला. सदर अहवाल मला दाखविला. तो **निशाणी क्र.७९** वर आहे. पोलिस घटनास्थळी आले. पोलिसांनी मला वैद्यकीय तपासणीसाठी उपजिल्हारूग्नालय मलकापूर येथे पाठविले होते. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. माझे तपासादरम्यान न्यायालयासमक्ष बयान नोंदविले होते. सदर बयान मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. ते **निशाणी क्र.८०** वर आहे. सदर जबाबाचे सिलबंद पाकीट न्यायालयासमोर उघडण्यात आले. त्यातील जबाब **निशाणी क्र.८१** वर आहे. मी पोलिसांना सदर घटनेच्या व्हीडीओ ची कॉपी पेनड्राईव्ह मध्ये दिली होती. सदर पेनड्राईव्ह **आर्टिकल-अ** वर आहे. सदर व्हीडीओ हा बँकेचा अधिकारी सगळाम याने ऑनलाईन वरून पेनड्राईव्ह मध्ये डाउनलोड केला होता. मी सर्व आरोपींना ओळखतो.

सरतपासपुर्ण.

## <u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस. एस. मोरे.</u>

०२. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार बँक शाखांमध्ये शाखा व्यवस्थापकाची कॅबीन सोडून इतर ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शाखाधिका-याच्या कॅबिनमध्ये त्याच्याकडून बेकायदेशीर कामे व्हावीत म्हणून सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसवलेले नाहीत. मी घटनेची वेळ फिर्याद देतेवेळी दिड वाजेची असल्याचे नमूद केले होते. सदर वेळ फिर्यादीमध्ये नमूद केलेली नाही. मी दि.२४/०८/२०२० रोजी पोलिस ठाण्यामध्ये गेलो नाही. मी त्यादिवशी फिर्याद दाखल केली नव्हती. मी घटनेची फिर्याद २४/०८/२०२० रोजीच दाखल केली असे म्हटल्यास चुकीचे ठरेल. सदर घटनेबाबत पोलिसांनी दि.२५/०८/२०२० रोजी अदखलपात्र गुन्हा नोंदविला होता. माझ्या फिर्यादीतील अधोरेखांकीत भाग-अ मी वाचला तो बरोबर लिहीलेला आहे.

०३. सर्व आरोपी हे एकत्रीत बँकेमध्ये आले. असे घडले होते की, एक अनोळखी इसम बँकेमध्ये आला त्याच्यासोबत अंदाजे २ ते ३ शेतकरी होते. त्यावेळी तो आत्ता च्या आत्ता कर्ज द्या असे म्हणाला. त्यावेळी त्याने मला शिवीगाळ केली. त्यावेळी त्याचे व माझे ५ ते ७ मिनीट बोलणे चालले. त्यानंतर त्याने इतर आरोपींना बोलावले. त्यानंतर १० ते १५ मिनीटांनी आरोपी तेथे आले. दि.२५/०८/२०२० च्या तक्रारीमध्ये मी आरोपींना ओळखत नसल्यामुळे त्यांचे नाव नोंदविले नाही. मला आरोपींची नावे पोलिसांकडून कळाली. मी घटनेपुर्वी कुठल्याही आरोपीला नावानिशी ओळखत नव्हतो. पोलिसांनी आरोपींची ओळख परेड घेतली नव्हती. मी आय.डी.बी.आय. बँक मलकापूर यथे अडीच वर्ष शाखाधिकारी होतो. त्यानंतर माझी सुरक्षेच्या करणास्तव बदली करण्यात आली.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी शाखाधिकारी म्हणून शेतक-यांची कामे करत नव्हतो व त्यांना शाखेत बसवून ठेवत होतो. आरोपी क्र.०१ हा काँग्रेस पक्षाचा तालुकाध्यक्ष होता किंवा नाही हे मला आठवत नाही. आरोपी क्र.०१ ने बँकेमध्ये पत्र

दिलेले होते. दि.१९/०८/२०२० रोजीचे पत्र मला दाखविले ते माझ्या बॅंकेत आलेले नाही. सदर पत्र **आर्टिकल-ब** वर आहे. घटनेच्या वेळी मलकापूर येथील राजेश एकडे हे विधानसभा सदस्य होते. उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये विधानसभा सदस्यांच्या उपस्थीतीमध्ये बॅंकशाखा अधिका-यांची कर्ज वाटप संदर्भात बैठक झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर बैठकीमध्ये विधानसभा सदस्यांनी मी शेतक-यांना कर्ज वाटप करत नाही अशी तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, कुंड येथील शेतक-यांनी माझ्याविरूध्द कर्ज वाटत संदर्भात तक्रार दिली होती.

०५. मी पोलिसांना पंचनाम्याच्यावेळी फेकलेल्या फाईल दाखवल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या राजकीय विरोधकांनी मला हाताशी धरून आरोपींविरूध्द खोटी फिर्याद देण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मी सांगितल्या प्रमाणे कुठलिही मारहाण केली नही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष दिली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by
RAJENDRAKUMAR
BABASAHEB GIRI
Date: 2026.03.11
17:43:54 +0545

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

मलकापूर.

मलकापुर.

दिनांक - ११/०३/२०२६.

## CERTIFICATE

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 11.03.2026 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 11.03.2026 |
| Date of uploading | : | 11.03.2026 |